# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
**४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.**
**दुरध्वनी क्रमांक. ०२० २५६५६२३४, ईमेल** ropune@dtemaharashtra.gov.in


जा.क्र.तंशि/विकापु/लेखा १/२०१९/ 3562 दिनांक - 29 AUG 2019

अत्यंत महत्वाचे व कालमर्यादित.

प्रति,
प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्था,
पुणे विभाग, पुणे.

विषय - अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१ आणि सुधारीत अंदाज २०१९-२० (योजनेत्तर) पाठविणेबाबत
संदर्भ - ०१.तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. ७/तंशिसं/अनुदान/अर्थसं२०१९/९० दि.२०/८/२०१९
०२.या कार्यालयाचे पत्र कं. तंशिविकापु/लेखा १/२०१९/३५४५ दिनांक २७/०८/२०१९
०३. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १५/अर्थसं/अ.अं.व सु.अं/२०१९-२०/६३ दिनांक २०/०८/२०१९

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्र क्रमांक ०१ व ०२ चे अवलोकन करावे. त्यानुसार सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०१९-२० सुधारीत अंदाजपत्रक तयार करतांना **संचालनालयाचे संदर्भिय पत्रातील १ ते १० सूचनाचे पालन करूनच अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. याशिवाय** संदर्भ कमांक ०४ नुसार संचालनालयाने आयोजित केलेल्या कार्यशाळेत दिलेल्या सूचना आपणास खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

अंदाजपत्रक मागणी करतांना हजारात करण्यात यावी.

तसेच संस्थामधील शिक्षकीय व शिक्षकेत्तर पदांना सातव्या वेतन आयोगानुसार ०१/०१/२०१६ रोजीची तात्पुरती वेतननिश्चिती करण्यात येवून सन २०१९-२० व २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.

प्रपत्र २ मध्ये प्रत्यक्ष ४ महिन्याचा खर्च व ८ महिन्याच्या खर्चाची मागणी व्यवस्थीत करण्यात यावी. पहिल्या ४ महिन्यातील ६ वा वेतन आयोग व ७ वा वेतन आयोग या मधील फरकाची रक्कम ८ महिन्यात इतर खर्चामध्ये समाविष्ठ करण्यात यावी.

शिक्षकीय पदाच्या वेतननिश्चती व वेतनश्रेणीसाठी दिनांक ०१/०३/२०१९ राजपत्र पहावे.

प्रपत्र ४ यामधील मंजुर पदे भरलेली पदे व रिक्त पदे ही सुध्दा शासन निर्णयानुसार असावी.

या शिवाय इतर सर्व विवरणपत्रे संपूर्ण व अचुक भरावीत.

कमी अधिक खर्चाबाबत व्यवस्थीत स्पष्टीकरण सोबत जोडणे बंधनकारक आहे. त्याशिवाय अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक स्विकारले जाणार नाहीत याची संस्था प्रमुखांनी खबरदारी घ्यावी.

तसेच अंदाजपत्रक तयार करतांना पदांच्या आढाव्यानुसार व त्यानंतरच्या शासन निर्णयान्वये वेळोवेळी मंजूर झालेल्या पदांप्रमाणे स्थायी/अस्थायी तसेच वर्ग निहाय पदे जुळवून, शासनाने मंजूर केलेल्या पदांचे व शासनामार्फत नियुक्त केलेल्या पदांचे, अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये अंर्तभूत करून पद निर्मितीचे शासन निर्णयाच्या प्रतीसह, विहीत प्रपत्रात योजनानिहाय सीआरसी व्हाईस अर्थसंकल्पीय अंदाज तयार करावे. तयार झालेले अंदाजपत्रक **सर्व संस्थाप्रमुखांनी स्वत: तपासणी करून बरोबर असल्याची खात्री करूनच ज्या कर्मचा-यांनी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार केलेले आहे त्यांनीच मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई येथे सादर करण्यापूर्वी या विभागीय कार्यालयास सादर करावे. विभागीय कार्यालयाने तपासणी केल्यानंतर संचालनालयाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार संचालनालयास सादर करण्यात यावे.**

**विभागीय कार्यालयास अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सादर करावयास येणे पूर्वी या कार्यालयातील सहाय्यक संचालक (अतांत्रिक) यांना दूरध्वनी करून येणे.**

प्र.सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे